# <u>*वार्तापत्र*</u>

कार्यालय पोलीस अधिक्षक
गडचिरोली, दिनांक ०७/०२/२०१८

## *दोन जहाल महिला माओवादयांचे आत्मसमर्पण*

महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या आत्मसमर्पन योजनेमुळे गडचिरोली जिल्हयातील माओवादी मोठया संख्येने आत्मसमर्पण करीत आहेत. आतापर्यंत वरिष्ठ माओवादी सदस्यांसह अनेक जहाल माओवादयांनी आत्मसमर्पण केल्याने व पोलीस दलाने त्यांचे पुनर्वसन घडवून आणल्यामुळे नुकतेच एकूण रुपये ६ लाख्र बक्षिस असलेल्या दोन जहाल महिला माओवादी यांनी आत्मसमर्पण केले आहे. यामुळे गडचिरोली जिल्हयातील माओवादी चळवळीला जबर धक्का बसला आहे. गडचिरोली पोलीसांनी आतापर्यंत केलेली कामगिरी तसेच जनतेचा संपादन केलेला विश्वास यामुळे माओवादी मोठयाप्रमाणात आत्मसमर्पण करीत आहेत. मा. पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख्र सा़े. यांच्या समोर दोन जहाल महिला माओवादयांनी आत्मसमर्पण केले आहे.

१) **<u>जया ऊर्फ शांती मासु मट्टामी</u>-** वय- २४ वर्ष ही माहे डिसेंबर २०१२ मध्ये भामरागड दलममध्ये सदस्य पदावर कार्यरत होती. यानंतर माहे मे-२०१३ ला भामरागड दलम मधून तिची बदली प्लाटून क्रमांक १४ मध्ये झाली होती. ६ डिसेंबर २०१७ रोजी झालेल्या पोलीस व माओवादी चकमकीनंतर वरिष्ठ माओवादयांच्या उपस्थितीत मौजा तोंडर जंगल परिसरात मिटींग झाली. यामध्ये तिची नियुक्ती प्लाटून क्रमांक १४ च्या उपकमांडर पदावर करण्याची घोषणा करण्यात आली. हिचा ख्रुनाचे ११ गुन्हे, जाळपोळीचे ६ गुन्हे, मौजा नैनेर चकमक (२०१३), मौजा बेजुरपल्ली चकमक (२०१३), मौजा नयगुंडा फाटा चकमक (२०१४), मौजा दोडगेर चकमक (२०१४) यासारख्या १२ पोलीस माओवादी चकमकीसह एकूण २९ गंभीर गुन्हयात सहभाग होता. शासनाने तिचेवर रुपये ४ लाख्र बक्षिस जाहिर केले होते.

२) **<u>रनिता ऊर्फ सुनिता नामदेव कोडापे</u>-** वय-१८ वर्ष ही माहे डिसेंबर २०१३ मध्ये अहेरी दलममध्ये सदस्य पदावर कार्यरत होती. माहे फेब्रुवारी-२०१६ पासून अहेरी दलम मधुन सिरोंचा दलममध्ये सदस्य पदावर कार्यरत होती. हिचा ख्रुनाचे ८ गुन्हे, जाळपोळीचे ४ गुन्हे, मौजा गुरजा